**'प्रेस नोट'** दिनांक:- १८/०७/२०२६

## ए.टी.एम.मशिनमध्ये प्लास्टिक फाईल/पट्टी लावून ग्राहकाचे पैसे चोरणा-या आरोपीस अटक करुन गुन्हा उघडकीस आणुन मालमत्ता हस्तगत केलेबाबत....

फिर्यादी नामे **श्रीमती रीचा अरुण श्रीवास्तव**, वय ३७ वर्षे, धंदा बॅक मॅनेजर, बॅंक ऑफ बडोदा शाखा भांडुप यांनी त्या कार्यरत असलेल्या बॅंकेच्या सचदेव कॉम्पलेक्स भांडूप येथील ए.टी.एम. मशिनमध्ये दोन अनोळखी इसमांनी प्लास्टिक फाईल/पट्टी लावून ए.टी.एम. मशीनमध्ये छेडछाड केल्याने ग्राहक पैसे काढण्याकरीता आल्यास त्यांचे पैसे ए.टी.एम. मशिनमधून बाहेर येत नाहीत, परंतू त्यांना ए.टी.एम.च्या स्क्रिनवर पैसे डेबिट झाल्याचे मेसेज येत असल्याच्या त्यांना ०५ तक्रारी बॅंकेस प्राप्त झाल्याबाबत तक्रार दिल्याने दोन अनोळखी इसमांविरोधात भांडुप पोलीस ठाणे, गु.र.क्र. ५९८/२६ कलम ३०५,३(५) भा. न्या. संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तपास पथकाने नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने सी.सी.टी.व्ही. फुटेजची तपासणी केली असता सदर गुन्हयात एकूण ०५ साक्षीदार वेगवेगळया वेळी ए.टी.एम. मध्ये पैसे काढण्यासाठी आले असता, सदर दोन अनोळखी आरोपीत इसमाने साक्षीदार येण्यापूर्वीच ए.टी.एम. मशीन मध्ये प्लास्टिक फाईल/पट्टी लावून ठेवली असल्याचे व पैसे ए.टी.एम.मध्ये अडकल्यानंतर आरोपीने येवून त्यातून पैसे चोरुन नेल्याचे असे सलग ०२ दिवसाचे ए.टी.एम. मशीन रुम मधील सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहून त्याच्यासोबत वेगवेगळया वेळी दोन पुरुष इसम व दोन महिलांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

तपास पथकाने सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करुन गुन्हयातील मुख्य आरोपी नामे मोहम्मद जियाद उर्फ अयान इर्शाद अहमद, २१ वर्षे,यास भांडूप परिसरातून ताब्यात घेवून दि. १५/०६/२०२६ रोजी अटक केले आहे. त्यानंतर नमुद अटक आरोपीसोबत ए.टी.एम. रुममध्ये येणारे सहआरोपी महिला नामे १) श्रीमती आरीफा अझीम दुकानदार, ४५ वर्षे, २) श्रीमती नमीरा अझीम दुकानदार, २४ वर्षे, यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना कलम ३५ (३) भा.ना.सु.सं. अन्वये नोटीस देण्यात आली असुन, आरोपीकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक तपास चालू आहे.

नमुद गुन्हयातील आरोपीकडून गुन्हयात वापरलेली १) मोटार सायकल किंमत रू. ८०,०००/- २) प्लास्टिकची ग्रे रंगाची पट्टी ३) रुपये १०,०००/- किंमतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल, ४) गुन्हयातील चोरीस गेलेली रोख रक्कम रुपये ३९,५००/- अशी एकूण १,२९,५००/- रूपये किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई मा. श्री. मनोजकुमार शर्मा पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मा. श्री. धनंजय कुलकर्णी, अप्पर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, श्री. अभयसिंह देशमुख, पोलीस उप आयुक्त, पूर्व परिमंडळ ३, श्री. अजय जोशी सहा. पोलीस आयुक्त, भांडुप विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली आणि व.पो.नि. सपना क्षिरसागर, पो. नि. नितीन चव्हाण (गुन्हे) स.पो.नि. शिवाजी मदने, पोलीस हवालदार दिपक लहाने, पोलीस हवालदार जयवंत मोरे, पोलीस हवालदार श्रीकांत माळी यांनी सदरची कामगिरी पुर्ण केली आहे.

**नागरीकांना आवाहन करण्यात येते की, ए.टी.एम. मशीनमध्ये व्यवहार केल्यानंतर बॅंक खात्यातून पैसे गेल्याचा संदेश आला असेल परंतू पैसे प्राप्त न झाल्यास नागरीकांनी पोलीसांशी त्वरीत संपर्क साधावा.**

---